जा.क्र. औ पो/सी.१/मत्स्य/निकष/पुर्रचना/८९
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक ७ फेब्रुवारी १९८९

प्रति
मत्स्यव्यवसाय संचालक
महाराष्ट्र शासन, मत्स्यव्यवसाय विभाग,
तारापोरवाला, मत्स्यालय, मुंबई ४०० ००२

विषयः १) मच्छीमार सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार्यतेचे निकष व त्या अनुषंगाने संस्थाची पुनर्रचना
२) मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या प्रशासकीय नियंत्रणाबाबत.

आपले जा.क्र. ०९१३०२/२०८८/८८ दि. १९.०७.१९८८ व ९१५०७/१२८८ दिनांक २८.१०.१९८८ ची वरील विषयाबाबतची अर्धशासकीय पत्रे कृपया पहावीत.

२. मच्छीमार सहकारी संस्थाचे आर्थिक व्यवहार्यतेचे निकष व त्या अनुषंगाने संस्थांची पुनर्रचना व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या प्रशासकीय नियंत्रणाबाबत काय धोरण असावे याबाबत संबंधितांची दि. ११.०१.१९८९ रोजी मुंबई येथे चर्चा आयोजित केली होती. सदरहू चर्चेत वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दिनांक ३१ मार्च १९७६ रोजी ठरविले नोंदणीचे निकष जे होते त्याबाबत सुधारणा करुन सुधारित निकष खालीलप्रमाणे असावेत असे चर्चेमध्ये ठरविण्यात आले.

अ) गोडया पाण्यातील प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था स्थापन करण्याचे निकषः-

१) नियोजित संस्थेच्या तलावातून नोंदलेले किमान मत्स्योत्पादन वार्षिक ६००० किलो असावे. त्यापैकी किमान ३००० किलो उत्पादन प्रमुख कार्पचे असावे. याबाबतीत जरुर ते प्रमाणपत्र नोंदणी प्रकरणासोबत जोडलेले असणे जरुर आहे. हे प्रमाणपत्र मत्स्यव्यवसाय विभाग खात्याचे असावे.
२) **नियोजित संस्थेकडे मत्स्यशेतीसाठी उपयोगी असे बारमाही तलावाचे किमान ३० हेक्टर जलक्षेत्र असावे.**
३) संस्थेचे कार्यक्षेत्राचा परिसर १० किलोमिटर पर्यंत असावा.
४) प्रत्यक्ष मच्छीमार करणारे किमान २५ सभासद व सुरवातीचे भाग भांडवल रु. १०००/- असावे.
५) वरील १ ते ४ निकषाची पूर्तता होत असल्यास प्रत्येक तलावाकरीता (धरणाचे तलाव वगळता) एक मच्छीमार सहकारी संस्था नोंदणीस हरकत नसावी.
६) धरणाचे तलावासाठी मात्र एका संस्थेऐवजी वरील निकषापूर्ती करणाऱ्या अनेक संस्था नोंदणीस हरकत नाही.

ब)    खाऱ्या पाण्यातील प्राथमिक मच्छीमार सहकारी संस्थांचे नोंदणीबाबत

१) नियोजित संस्थेस सुरुवातीला किमान २५ सभासद असावेत व संस्थेचे भागभांडवल किमान रु. २५,०००/- असावे.

२) नियोजित संस्थेच्या सभासदांच्या कमीत कमी १० नौका असाव्यात, त्यापैकी किमान ५ यांत्रिक नौका असाव्यात (२ सिलींडर किंवा अधिक सिलेंडरच्या)

३) नियोजित संस्थेचे कार्यक्षेत्र लॅडिंग साईटपासून ५ किलोमिटर परिसरातील गावापुरते मर्यादित असावे.

४) नवीन संस्था स्थापन करताना आधीपासून अस्तित्वात असलेल्या लगतच्या मच्छीमार सहकारी संस्थांच्या आर्थिक क्षमतेवर विपरीत परिणाम होणार नाही हे पहावे.

५) नियोजित प्राथमिक मच्छीमार सहकारी संस्थेशी संभाव्य मार्केटिंगचे व्यवहार वार्षिक किमान १० लक्ष रुपये असावे.

६) **मत्स्यव्यवसायाशी संबंधित असलेल्या उद्दिष्टांकरीता (उदा. मार्केटिंग, प्रोसेसिंग, स्टोअरेज) इ. यासाठी** स्वतंत्र कोळी मच्छीमार संस्था न नोंदविता सर्व व्यवहार एकाच मच्छीमार सहकारी संस्थेमार्फत हाताळण्यास यावेत. वरील सुधारीत निकष नवीन मच्छीमार सहकारी संस्थांना लागू करावेत.

मच्छीमार सहकारी संस्थांची त्रिस्तरीय रचना आपण आपल्या दिनांक २८.१०.८८ च्या अर्धशासकीय पत्रासोबत जी टिपणी पाठविण्यात आली होती. त्याबाबत पण चर्चा झाली. त्यावेळी चर्चेमध्ये स्पष्ट करण्यात आले की सध्या सहकारी संघाचे कार्यवाढविण्यास अडचणी उद्‌भवतात. जिल्हा संघाने शासकीय तलावाची कंत्राटे मिळविण्याऐवजी विभागीय संघाना अशी कंत्राटे मिळाल्यामुळे जिल्हा संघाचे कामावर अनिष्ट परिणाम होतो. तेव्हा धोरण म्हणून प्राथमिक मच्छीमार संस्था अशी त्रिस्तरीय रचना असावी आणि शासनाच्या योजनेचा फायदा या मिळावा. ज्या ठिकाणी जिल्हा मच्छीमार सहकारी संघ कार्यरत नाहीत त्या जिल्हयापुरतेच विभागीय मच्छीमार सहकारी संघांना काम करण्यास शासकीय सवलत मिळावी. तसेच मत्स्यबीज वाटप इ. कामे मिळावीत.

**वर नमूद केलेले सुधारीत निकष संबंधितांना कळविण्यापूर्वी आपणाकडे पाठविण्यात येत आहेत. आपणांस विनंती करण्यात येत आहे की याबाबत आपले मत लवकरात लवकर देण्यात यावे.** आपणाकडून संमती आल्यानंतर सुधारीत निकष संबंधितांना कळविण्यात येतील.
मा. सहकार आयुक्त यांचे मान्यतेने.

**सही**
**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकरिता**